3 1 JUL 2025 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. दिगंबर शिर्के वारणा समूह विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाची मुदत संपण्यापूर्वीच कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या गळ्यात वारणानगर येथील वारणा समूह विद्यापीठाच्या प्रथम कुलगुरूपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाकडून मंगळवारी नियुक्तीचा आदेश प्राप्त झाला.

डॉ. शिर्के हे शिवाजी विद्यापीठातील कार्यकाळ पूर्ण होईपर्यंत त्या पदाची कर्तव्ये सांभाळून वारणा विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून अतिरिक्त कार्यभार धारण करतील, असेही आदेशामध्ये म्हटले आहे.

**पक्की सांख्यिकी**

सांख्यिकी या विषयाचे प्राध्यापक असलेले डॉ. शिर्के यांचे कुलगुरूपदाची सांख्यिकी पक्की असल्याचे गेल्या काही वर्षांतील सलग कामगिरीतून दिसून आले आहे. सातारा येथे नव्याने स्थापित कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून अतिरिक्त कार्यभार त्यांनी सांभाळला आहे. आता शिवाजी विद्यापीठपाठोपाठ त्यांना वारणा समूहातही जबाबदारी मिळाली आहे.

**मातृसंस्थेत कामाची संधी - डॉ. शिर्के**

पदवीस्तरावरील प्रथम वर्षाचे शिक्षण हे वारणा संस्थेमध्ये झाले असल्याने ही निवड माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. शिवाजी विद्यापीठातील सेवा पूर्ण करीत असतानाच ही नवी संधी प्राप्त झाल्याने या मातृसंस्थेसाठीही काम करता येणार असल्याचा आनंद वाटतो, अशी भावना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली.

31 JUL 2025 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नव्या वैज्ञानिक वाटा शोधाव्या लागतील


## आंतरराष्ट्रीय ख्यातीचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. राजमल जैन यांचे प्रतिपादन : विद्यापीठात सत्कार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विक्रम साराभाई यांनी भारताला अवकाश संशोधनात जागतिक ओळख मिळवून दिली. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊनच आपल्याला नव्या वैज्ञानिक वाटा शोधाव्या लागतील, असे प्रतिपादन मुरादाबाद उत्तर प्रदेश येथील तीर्थंकर महावीर विद्यापीठाचे प्राध्यापक आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. राजमल जैन यांनी केले.

भौतिकशास्त्र अधिविभागाच्या वतीने भौतिकशास्त्र विभागाच्या सभागृहात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'भारत आणि अवकाश" हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी अधिविभागप्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे होते.

डॉ. जैन म्हणाले, भारताचा संशोधन प्रवासावर फार मोठा आहे. भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या स्थापनेपासून यशस्वी मोहिमा केल्या आहेत. चांद्रयान-१, चांद्रयान-२, मंगळयान, अदित्य-११ मिशन



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागातील आयोजित व्याख्यानात खगोलशास्त्रज्ञ डॉ. राजमल जैन यांचा सत्कार करताना डॉ. आर. जी. सोनकवडे.**

यशस्वी केल्या आहेत. सध्या भारताकडून नवीन मोहिमेची तयारी सुरू आहे. भारत विज्ञान क्षेत्रात आत्मनिर्भर आहे. भारताच्या अंतराळ क्षेत्राने केवळ तांत्रिक क्षेत्रातच नव्हे. तर आर्थिकदृष्ट्या जगभरात एक विशेष स्थान निर्माण केले आहे. इस्रोची स्वदेशी उपग्रह प्रक्षेपण प्रणाली जीएसएलव्ही व पीएसएलव्ही अतिशय सक्षम आहे. अमेरिका, जपान, युरोप, रशिया अशा अनेक देशांनी विरोध केला आहे. तरीही भारतीय शास्त्रज्ञांच्या संघर्षमय आणि यशस्वी वाटचाल सुरू आहे.

भारताची विज्ञानातील कारकिर्दीची व्याप्ती मोठी आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रोच्या यशाची आणखी एक भव्य झेप म्हणजे चांद्रयान-३ या भारताच्या चंद्रावरील यशस्वी मोहिम आहे. मर्यादित साधन संपत्ती असूनही वैज्ञानिक दृष्टीकोन, सातत्य व आत्मनिर्भरता यांच्या बळावर जागतिक स्तरावर यश मिळवता येते. सूर्य आणि पृथ्वीचं नात अंतराळातील दोन खगोलीय वस्तूंमधील भौतिक संबंध नाही. तर संपूर्ण सजीव सृष्टीच्या अस्तित्वाचं मूळ कारण आहे. अध्यक्षस्थानावरून डॉ. सोनकवडे म्हणाले, भारत तांत्रिक प्रगतीत सक्षम आहे. अवकाशातील मोहिमांसंदर्भात भारत जागरूक आहे.

तरुण भारत

विद्यापीठातून

पाहुण्यांचा परिच व प्रास्ताविक डॉ. आर. एस. व्हटकर यांनी केले. विद्यार्थिनी वैष्णवी याद्रव आणि प्रज्ञा गणगे यांनी सुत्रसंचालन केले. डॉ. व्ही. एस. कुंभार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. एन. एल. तरवाळ, डॉ. एस. पी. दास, डॉ. एम. आर. वायकर, डॉ. ए. आर. पाटील, डॉ. एस. एस. पाटील आदी उपस्थित होते.

3 1 JUL 2025 सकाळ
जनसपक कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांना समजल्या नव्या अवकाश मोहिमा

## विद्यापीठात आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्रज्ञ राजमल जैन यांचे मार्गदर्शन

कोल्हापूर, ता. ३० : उत्तर प्रदेशातील मोरादाबादमधील तीर्थंकर महावीर विद्यापीठाचे प्राध्यापक आणि आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्रज्ञ प्रा. राजमल जैन यांचे शिवाजी विद्यापीठात भौतिकशास्त्र अधिविभागात 'भारत आणि अवकाश' या विषयावर व्याख्यान झाले. त्यामध्ये विद्यार्थ्यांना चांद्रयान-एक, चांद्रयान-दोन, मंगळयान, आदित्य-इलेवन आदींसह सध्या सुरू असलेल्या नवीन मोहिमा समजल्या.



कोल्हापूर : प्रा. राजमल जैन यांचा सत्कार करताना प्रा. डॉ. सोनकवडे.

विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागाच्या सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे होते. 'विक्रम साराभाई यांनी भारताला अवकाश संशोधनात जागतिक ओळख मिळवून दिली. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊनच आपल्याला नव्या वैज्ञानिक वाटा शोधाव्या लागतील. भारताच्या अंतराळ क्षेत्राने केवळ तांत्रिक क्षेत्रातच नव्हे तर आर्थिकदृष्ट्या किफायतशीरतेच्या बाबतीतही जगभरात एक विशेष स्थान निर्माण केले असल्याचे प्रा. जैन यांनी सांगितले. इस्रोच्या यशाची आणखी एक भव्य झेप म्हणजे चांद्रयान-तीन असून, त्या यशस्वी मोहिमेचे उदाहरण देत त्यांनी मर्यादित साधनसंपत्ती असूनही वैज्ञानिक दृष्टिकोन, सातत्य व आत्मनिर्भरता यांच्या बळावर जागतिक स्तरावर यश मिळवता येत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. सोनकवडे यांनी तांत्रिक प्रगतीशी संबंधित फायदे आणि जोखीम याबाबत जागरूक राहण्याचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. आर. एस. व्हटकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रा. डॉ. के. वाय. राजपुरे, ए. व्ही. मोहोळकर, एन. एल. तरवाल, एस. पी. दास, एम. आर. वायकर, ए. आर. पाटील, एस. एस. पाटील उपस्थित होते. वैष्णवी यादव, प्रज्ञा गणगे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. व्ही. एस. कुंभार यांनी आभार मानले.

पुढारी

# अवकाश संशोधनाच्या बळावर भारताची यशस्वी झेप : प्रा. जैन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



प्रा. राजमल जैन

भारताने अवकाश संशोधन क्षेत्रात आत्मनिर्भरतेच्या बळावर जागतिक पातळीवर मोठी झेप घेतली आहे. त्यामागे भारतीय शास्त्रज्ञांची दूरदृष्टी, सातत्य आणि वैज्ञानिक दृष्टिकोन कारणीभूत आहे, असे प्रतिपादन खगोलशास्त्रज्ञ प्रा. राजमल जैन यांनी केले. 'भारत आणि अवकाश' या विषयावर त्यांनी भौतिकशास्त्र विभागातर्फे आयोजित व्याख्यानात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

रॉयल ॲस्ट्रोनॉमिकल सोसायटीचे (इंग्लंड) मानद फेलो असलेल्या प्रा. जैन यांनी 'इस्रो'च्या स्थापनेपासून ते चांद्रयान-३ आणि आदित्य-११ या मिशनपर्यंतचा प्रवास उलगडून सांगितला. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे होते.

प्रा. जैन यांनी 'इस्रो'च्या स्वदेशी प्रक्षेपण यंत्रणा पीएसएलव्ही आणि जीएसएलव्हीचा उल्लेख करत भारताने कमी खर्चातही जागतिक यश कसे मिळवले, हे विशद केले. अमेरिका, रशिया, युरोप व जपानसारख्या प्रगत देशांच्या स्पर्धेत भारताने केलेली मजल ही आत्मनिर्भरतेचे जिवंत उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. आर. एस. व्हटकर यांनी प्रा. जैन यांचा परिचय करून दिला. यावेळी प्रा. जैन यांचा पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. डॉ. व्ही. एस. कुंभार यांनी आभार मानले. सूत्रसंचालन वैष्णवी यादव आणि प्रज्ञा गणगे यांनी केले. यावेळी भौतिकशास्त्र विभागातील प्रा. डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. एन. एल. तरवाल, डॉ. एस. पी. दास, डॉ. एम. आर. वायकर, डॉ. ए. आर. पाटील, डॉ. एस. एस. पाटील यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

31 JUL 2025 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सरोळी'त होणार विद्यापीठाचे कौशल्य विकास उपकेंद्र

## विद्यार्थ्यांना मिळणार व्यावसायिक प्रशिक्षण; शिनोळीतील केंद्र बंद करण्याचा निर्णय

संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३० : गडहिंग्लज शहरापासून २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या सरोळी या गावामध्ये शिवाजी विद्यापीठाकडून कौशल्य विकास उपकेंद्र सुरू केले जाणार आहे. त्याठिकाणी तरुणाईला उपयुक्त ठरणाऱ्या कौशल्याआधारित अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाणार आहे.**

सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाच्या निर्देशानुसार विद्यापीठाने चंदगड तालुक्यातील शिनोळीमध्ये गेल्या चार वर्षांपूर्वी कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र सुरू केले. तेथे ये-जा करणे सोयीस्कर नसल्याने विद्यार्थ्यांनी त्याकडे पाठ फिरवली. दोन वर्षांपूर्वी तर या केंद्रात केवळ नऊ विद्यार्थी प्रवेशित झाले होते. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद नसल्याने मागील वर्षी या केंद्रातील प्रवेश प्रक्रिया बंद राहिली. विद्यापीठाने या केंद्राचे ठिकाण बदलण्याची मागणी केली होती. त्याची दखल घेऊन विद्यापीठाने व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास समिती नेमली. त्यात सदस्य म्हणून ए. सी. रजपूत, ॲड. स्वागत परुळेकर यांचा समावेश होता. त्यांच्यासह कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. आर. जी. पवार, कौशल्य विकास अधिकारी रोहन कांबळे यांनी पाहणी, चौकशी करून विद्यार्थ्यांची मते जाणून घेऊन गडहिंग्लज तालुक्यातील सरोळी येथे उपकेंद्र सुरू करण्याबाबतची शिफारस विद्यापीठ प्रशासनाला केली. त्यानुसार व्यवस्थापन परिषदेने सरोळीमध्ये उपकेंद्र सुरू करण्यास गेल्या आठवड्यात मान्यता दिली. प्रत्यक्ष केंद्र सुरू करण्याच्या प्रक्रियेचा लवकरच प्रारंभ होणार आहे.



### विविध अभ्यासक्रमांचे शिक्षण-प्रशिक्षण

या उपकेंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी उद्योग, स्वयंरोजगार, नवउद्यमतेबाबतचे विविध व्यावसायिक व कौशल्याधिष्ठित तीन ते सहा महिन्यांच्या कालावधीचे प्रशिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जाणार आहेत. त्यात सेंद्रिय भाजीपाला उत्पादन, औषधी वनस्पतींची ओळख, हस्तकला वस्तू बनविणे, ले-आऊट प्रिंटिंग, अकौंटिंग-जीएसटी प्रणाली, दुचाकी दुरुस्ती आदी २० अभ्यासक्रमांचा समावेश राहील.

| कॉलेज, विद्यार्थ्यांची आकडेवारी | | | |
|---|---|---|---|
| तालुका | कॉलेज | विद्यार्थी | विद्यार्थिनी |
| गडहिंग्लज | ५ | ६१४१ | ५३१४ |
| चंदगड | ३ | २२७४ | २००४ |
| आजरा | २ | ११०८ | ८३८ |
| एकुण | १० | ९५२३ | ८१५६ |

### म्हणून 'सरोळी'ची निवड

आजरा, चंदगड, गडहिंग्लज तालुक्यांतील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सरोळी येथे येणे सोयीस्कर ठरणारे आहे. त्यामुळे विद्यापीठाने उपकेंद्रासाठी 'सरोळी'ची निवड केली आहे. दर्जेदार शिक्षण हे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचले पाहिजे आणि ते सर्वांना परवडणारे असले पाहिजे. कारण हेच शिक्षण त्यांना त्यांच्या दैनंदिन समस्या स्वतःच सोडविण्यास सक्षम करणार असल्याचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी सांगितले.

> 'शिनोळी येथील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र बंद करून सरोळी येथे मध्यवर्ती विद्यार्थ्यांना सोयीच्या दृष्टीने नव्याने सुरू करण्याचा निर्णय झाला आहे. सरोळी येथील नियोजित कौशल्य विकास उपकेंद्र हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नक्कीच शैक्षणिक वरदान ठरेल. वेगळे रोजगारकेंद्रित अभ्यासक्रम तेथे उपलब्ध करून दिले जाणार आहेत.
>
> **- ॲड. स्वागत परुळेकर,**
> व्यवस्थापन परिषद सदस्य